विषय :- भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील भटकी कुत्री पकडुन त्यांच्यावर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करणे व त्या कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक (श्वानदंश प्रतिबंधक) लस देणेसाठी निविदे द्वारे प्राप्त झालेले वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट,सफिलगुडा,हैद्राबाद यांनी सादर केलेल्या दरास व निविदाकारास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावना :-

शहर क्षेत्रातील भटकी कुत्री पकडुन त्यांच्यावर निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया करणे व त्या कुत्र्यांना रेबिज प्रतिबंधक (श्वानदंश प्रतिबंधक) लस देणेसाठी ५ वर्षाच्या कालावधीसाठी सुधारित निविदा फेर-१ ऑन्‌लाईन निविदा मागविणे व बाजाराभावातील प्रति श्वानाचे नर व मादी या प्रमाणे दर मागविणे कामी मा.आयुक्त सो. यांनी दि.९/०७/२०२४ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार दि.११/०७/२०२४ ते दि.१८/०७/२०२४ रोजी निविदा मागविण्यात आले असता दि.१९/०७/२०२४ रोजी उक्त निविदा खुले करण्यात आले असता सदर निविदेसाठी ५ निविदाकार यांनी सहभाग घेतला होता

निविदेच्या अटी शर्तीची पुर्तता मा.निविदा समिती समक्ष करण्यात आली असता अटी शर्ती अंती ४ निविदाकार पात्र झाले असून पात्र झालेले निविदा यांचे लिफाफा क्र.२ (फायनाशियल/आर्थिक बोलीचा लिफाफा) खुले करणेचे निर्देश मा.निविदा समिती यांनी दि.२४/०७/२०२४ रोजी दिले असता खालील प्रमाणे निविदाकार यांनी प्रति श्वान नर व मादी या प्रमाणे सादर केले आहे.

| निविदाकाराचे नाव | कामाचा तपशील | प्रति नर श्वानाचे दर | प्रति मादी श्वानाचे दर |
|---|---|---|---|
| वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा,हैद्राबाद | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे | रु.१४४०/- | रु.१४९०/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे | रु.१०/- | रु.१०/- |
| | भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. | रु.५०/- | --- |
| | | रु.३०००/- | |
| नवोदय वेट सोसायटी, गुरुरामगुड़ा, हैद्राबाद | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे | रु.१७५०/- | रु.१८००/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे | रु.२००/- | रु.२००/- |
| | भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. | रु.४५०/- | रु.४५०/- |
| | | रु.४४००/- | |
| स्वंतत्र ॲनिमल वेल्फेअर सोसायटी,रमांथपूर, हैद्राबाद | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे | रु.१७००/- | रु.१७५०/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे | रु.१५०/- | रु.१५०/- |
| | भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. | रु.५००/- | रु.५००/- |
| | | रु.४२५०/- | |
| अरिहंत वेल्फेअर सोसायटी, उस्मानाबाद | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे | रु.१२९०/- | रु.१२९०/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे | रु.५००/- | रु.५००/- |
| | भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. | रु.४४९/- | रु.४४९/- |
| | | रु.४०२९/- | |

वरिल तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता सर्वात कमी दराचे निविदाकार मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद व अरिहंत वेल्फेअर सोसायटी, उस्मानाबाद यांनी सादर केलेल्या दराचा तपशील खालील प्रमाणे

| निविदाकाराचे नाव | कामाचा तपशील | प्रति श्वानाचा दर |
|---|---|---|
| वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा,हैद्राबाद | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे प्रति श्वान नर | रु.१४४०/- |
| | भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे प्रति श्वान मादी | रु.१४९०/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे प्रति श्वान नर | रु.१०/- |
| | भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे प्रति श्वान मादी | रु.१०/- |
| | भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे प्रति श्वान नर व मादी | रु.५०/- |
| | | रु.३०००/- |

वरिल प्रमाणे http://mahatender.gov.in या वेबसाईटवर सादर केलेल्या दरांचे अवलोकन केले असता L1 मध्ये मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद हे असुन त्यास मा.निविदा समितीने मान्यता दिली आह.

L1 मधील मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद यांनी सादर केलेल्या दर मध्ये वाटाघाटी करणेसाठी मा.उप-आयुक्त सो.(आरोग्य) यांचे मान्यतेने दि.२६/०७/२०२४ रोजी पाचारण करण्यात आले अस‌ता उक्त ठेकेदार यांनी निविदे मध्ये सादर केलेले दर हे अंतिम असल्याचे सांगितले.

तरी http://mahatender.gov.in या वेबसाईटवर सादर केलेल्या दरांचे अवलोकना नुसार L1 मधील मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद यांनी १)भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया,खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे, २)भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे, व ३) भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे इत्यादी कार्यवाही होणे गरजेचे आहे.

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यां बाबत तारांकित,लक्षवेधी,स्थानिक नागरिकांच्या तक्रारी तसेच शासना कडुन गुगल शिटवर माहिती अद्यावत सादर करणे बाबत निर्देश असतात सदर कामाचे गाभिर्यलक्षात घेता व निकाड पाहता स्थानिक नागरिकांच्या भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या वाढत्या तक्रारी नुसार भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यां बाबतचा प्रश्न ज्वलंत आहे.तसेच सदर बाबती मा.राज्य मानवी हक्क आयोग,मुंबई येथे याचिक क्र.१७५३/१३/३०/२०२४ दाखल झालेली असुन सदरची पुढील तारीख दि.३१/०७/२०२४ रोजी आहे.

सबब http://mahatender.gov.in या वेबसाईटवर सादर केलेल्या दरांचे अवलोकना नुसार L1 मधील मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद यांनी १)भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया,खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे,प्रति

श्वान नग रु.१४४०/ व प्रति मादी रु.१४९०/-, २)भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे, प्रति श्वान नग रु.१०/ व प्रति मादी रु.१०/-, व ३) भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे प्रति श्वान नर/मादी रु.५०/-,असे दर सादर केले असुन उक्त दर हे मान्य असल्याचे L1 मधील मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट, सफिलगुडा, हैद्राबाद यांनी दि.२९/०७/२०२४ रोजी निविदा मध्ये भरण्यात आलेले दर मध्ये काम करण्याची सहमती दर्शविण्यात आली असुन सादर केलेल्या द हे मनपाच्या अंदाजित दरा पेक्षा कमी सादर केले आहे. सद्यास्थितीत मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळवी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. ४६५ दि.२९/०८/२०२४

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील १)भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे,प्रति श्वान नर रु.१४४०/- व प्रति मादी रु.१४९०/-, २)भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे, प्रति श्वान नर/मादी रु.१०/- व ३) भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. प्रति श्वान नर/मादी रु.५०/-,असे दर सादर केले असुन सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या दरास तसेच सदरचे काम ५ वर्षाच्या कालावधीत करणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विभागाने शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी मनपा कार्यक्षेत्रातील १)भटक्या श्वानाना पकडणे,त्यांवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया, खानपान व्यवस्था करणे व पुन्हा जागेवर सोडणे,प्रति श्वान नग रु.१४४०/- व प्रति मादी रु.१४९०/-, २)भटक्या जखमी/पिसाळलेल्या श्वानान पडकणे त्यांवर उपचार करणे, लसीकरण करणे व पुन्हा जागेवर जाऊन सोडणे, प्रति श्वान नर/मादी रु.१०/ व ३) भटक्या श्वानाना जागेवर जाऊन फक्त रोबिज लस टोचणे. प्रति श्वान नर/मादी रु.५०/-,असे दर मे.वेट्स सोसायटी फोर ॲनिमल वेलफेअर ॲण्ड रुरल डेव्हलपमेन्ट,सफिलगुडा,हैद्राबाद यांनी सादर केले असुन सादर केलेल्या निविदाकारक यांना व त्यांनी सादर केलेल्या दरास तसेच सदरचे काम सुरु झाले पासुन ५ वर्षाच्या कालावधीत करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका